ePaper

## व्लादिमीर पुतीन यांचा मृत्यू; रशियाच्या सत्तेवर त्यांच्यासारखी दिसणारी व्यक्ती; ब्रिटनच्या गुप्तचर यंत्रणेचा दावा



| वर्ष - 6 | अंक - 55 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 30 मे 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

### आतील पानांत

- नऱ्हे येथील नागरी समस्यांसाठी राष्ट्रवादीचे मोरे यांचे आमरण उपोषण
- बैलांनाही खेळावसं वाटतं; शर्यतींना विदेशातून लगाम घालण्याचा प्रयत्न!
- राणा दाम्पत्याला स्वागत रॅली भोवली!



आदित्य ठाकरे हे फार लहान असून क्यूट आहेत. ते कधी नकारात्मक बोलत नाही हे मला आवडतं असं सांगत त्यांनी कौतुक केलं. खूप काम करा असा सल्ला यावेळी त्यांनी दिला. सुप्रिया सुळेंचा जास्त परिचय नाही सांगत मला चांगला गुण सांगता येणार नाही पण त्या वडिलांची काळजी घेणाऱ्या आहेत त्यामुळे मी त्यांच्याशी जोडले जाऊ शकते असं त्यांनी सांगितलं. शरद पवारांना जेव्हा त्या चप्पल घालत होत्या ते पाहून मी फार भावूक झाले. किती मोठं भाग्य आहे त्यांचं असा विचार माझ्या मनात आहे.

- **पंकजा मुंडे,** भाजप नेत्या

शिवसनेचे नाही फुटले तर राष्ट्रवादीचे फुटणार, राष्ट्रवादीचे फुटत नाही तर काँग्रेसचे येत आहेत. हा फुटणार तो फुटणार तुमचं नशीब फुटलय ते बघा आदी, यापुढे महाराष्ट्रात भाजपचे राज्य कधीच येणार नाही. हे तुम्हाला कागलच्या चौकात सांगतो आहे. पुरोगामी विचारांचे राज्य आहे. बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रेरणेतून उभी राहिलेली शिवसेना त्याचे नेतृत्व करणारे उद्धव ठाकरे राज्याचे नेतृत्व करत आहेत.

**-संजय राऊत,** शिवसेना नेते



### शॉर्ट न्यूज »

#### पुण्यात करोनाचे नवीन व्हेरिएंट; सूक्ष्मजीव

**। पुणे ।** 'ओमायक्रॉन'च्या विषाणूचे बीए ४, बीए ५ हे दोन नवे विषाणू आढळले असले, तरी चिंता करण्याचे कारण नाही. पुण्यासह महाराष्ट्रात पूर्वीच्या विषाणूंचा संसर्ग, लसीकरणामुळे सामूहिक रोगप्रतिकारशक्ती निर्माण झाली आहे. त्यामुळे नव्या विषाणू प्रकाराच्या संसर्गापासून दक्ष राहावे लागणार आहे. रुग्णालयात दाखल व्हावे लागते का, हेही पाहावे लागणार असल्याचे सूक्ष्मजीव शास्त्रज्ञांनी स्पष्ट केले. करोनाच्या दुसऱ्या लाटेत 'कप्पा', 'डेल्टा'सारखे नवे विषाणू प्रकार शोधण्यात पुण्याच्या बी. जे. मेडिकल कॉलेजच्या सूक्ष्मजीवशास्त्र विभागाचा मोठा वाटा आहे. देशभरातील प्रयोगशाळांचे समन्वय करण्याची भूमिका सध्या बीजे मेडिकल कॉलेजकडे आहे.

### चिखली परिसरातील भागास वाढीव पाण्यातून पुरवठा होणार!

# 15 दिवसांनंतर 100 एमएलडी अतिरिक्त पाणी मिळणार!

### पिंपरी-चिंचवड आयुक्त तथा प्रशासन राजेश पाटील यांची माहिती

**। पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

आंद्रा धरण योजनेतील इंद्रायणी नदीतून पाणी उचलण्यासाठी निघोजे, तळवडे येथील अशुद्ध जलउपसा केंद्र आणि चिखली जलशुद्धीकरण केंद्रांपर्यंत मुख्य जलवाहिनी टाकणे, विद्युत पुरवठ्याचे काम येत्या 15 दिवसांत पूर्ण होईल. त्यानंतर चिखली केंद्रास 100 एमएलडी पाणी उपलब्ध होणार



असल्याचे महापालिका आयुक्त राजेश पाटील यांनी सांगितले.

चिखली केंद्रास 100 एमएलडी पाणी मिळणार असे, वर्षभरापासून सांगितले जात आहे. त्यासाठी प्रशासन व पदाधिका-यांनी वेगवेगळ्या तारख्या घोषित केल्या. मात्र, प्रत्यक्षात अद्याप शहराला पाणी मिळलेले नाही. या संदर्भात आयुक्तांना विचारले असते ते बोलत होते. चिखली परिसरातील भागास वाढीव पाण्यातून पुरवठा केला जाईल. निगडी केंद्रांतून तेथे पुरविले जाणारे पाणी इतर भागात वळविले जाईल. त्यामुळे पावसाळ्यात शहराला अतिरिक्त पाणी मिळू शकणार आहे.

निघोजे अशुद्ध जलउपसा केंद्र आणि चिखली जलशुद्धीकरण केंद्राचे काम जवळजवळ पूर्ण झाले आहे. दोन्ही केंद्रांना वीजपुरवठ्यासाठी भूमिगत वाहिनी टाकण्याचे काम सुरू आहे. तोपर्यंत तात्पुरत्या स्वरूपात वीजजोड घेतला जाणार आहे. चिखली केंद्रास पाणी उपलब्ध झाल्यानंतर तांत्रिक चाचण्या घेतल्या जाणार आहेत. ते शुद्धीकरण प्रक्रिया नियमितपणे सुरू झाल्यानंतर चिखली परिसरातील भागात ते पाणी पुरविले जाणार आहेत. त्यानंतर निगडी सेक्टर क्रमांक 23 येथून त्या भागास दिले जाणारे पाणी शहरातील इतर परिसरात वळविले जाणार आहे. त्यामुळे शहराला अतिरिक्त पाणी उपलब्ध होणार आहे.

**-राजेश पाटील,** आयुक्त तथा प्रसाशक

# स्वातंत्र्यवीर सावरकर हा सूर्य कधी मावळला नाही आणि तो कधी मावळणारही नाही

### प्रसिद्ध अभिनेते शरद पोंक्षे यांचे प्रतिपादन

**। पुणे । महाईन्यूज ।**

**स्वातंत्र्यानंतर** पन्नास वर्षांहून अधिक काळ गल्लीपासून दिल्लीपर्यंत कॉंग्रेसची सत्ता होती. या काळात शक्य त्या मार्गाने स्वातंत्र्यवीर सावरकरांची बदनामी करण्याचा प्रयत्न केला गेला. परंतु, स्वातंत्र्यवीर सावरकर हा सूर्य कधी मावळला नाही आणि तो कधी मावळणारही नाही, असे मत प्रसिद्ध अभिनेते शरद पोंक्षे यांनी व्यक्त केले. अहिंसेने रक्षण करता येत नाही. त्यासाठी शस्त्रच हाती घ्यावे लागते, असेही पोंक्षे म्हणाले. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या १३९ व्या जयंतीनिमित्त स्वा. सावरकर जयंती समितीतर्फे पुण्यात 'स्वातंत्र्यवीर सावरकर विचार दर्शन' या विषयावर पोंक्षे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. ज्येष्ठ अभिनेते विक्रम गोखले, अभिनेते व दिग्दर्शक प्रवीण तरडे, विवेक जोशी, प्रकाशक पार्थ बावस्कर, समितीचे सूर्यकांत पाठक, विद्याधर नारगोळकर, विश्वनाथ भालेराव, मकरंद माणकीकर, श्रीकांत जोशी यावेळी उपस्थित होते. शब्दांमृत प्रकाशनतर्फे शरद पोंक्षे यांच्या 'दुसरं वादळ' या पुस्तकाचे प्रकाशन या कार्यक्रमात करण्यात आले. पोंक्षे म्हणाले, सावकरांना टिळकांची कॉंग्रेस मान्य होती. गांधींची नव्हती. हिंदी राष्ट्रवाद, मुस्लिमांचे पराकोटीचे लांगुलचालन यामुळे मी कॉंग्रेसमध्ये कधीच येऊ शकत नाही, हे सावकरांनी स्पष्ट केले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वत:ला गांधीवादी म्हणत असले, तरी ते मूळ सावरकरवादी आहेत. राजकीयदृष्ट्या योग्य भूमिका स्वीकारणे त्यांना जमते. इंदिरा गांधी यांनी पंतप्रधानपदी असताना त्यांनी सावरकरांचा गौरव केला होता.



अंदमानातून सुटल्यानंतर स्वातंत्र्यवीर सावरकरांनी समाजसुधारक म्हणून मोठे कार्य उभारले. त्यांनी सर्व जातींमधील मुलांच्या मुंजी लावल्या. आंतरजातीय विवाह घडवून आणले. सहभोजने घातली. मंदिरे खुली केली. सावरकरांच्या विरोधकांवर जातीद्वेष, जातीभेदाचेच संस्कार होते. आमच्यावर सावरकरांचे संस्कार आहेत. राम जिंकणार, रावण हरणार, यावर माझा ठाम विश्वास आहे. - **शरद पोंक्षे,** अभिनेते

## शॉर्ट न्यूज »

### पुष्पा हेगडे यांची आंतरराष्ट्रीय महिला परिषदेच्या उपाध्यक्षपदी निवड

पुणे । महाईन्यूज ।



आंतरराष्ट्रीय महिला परिषदेच्या (इंटरनॅशनल कौन्सिल फॉर वूमन-आयसीडब्ल्यू) उपाध्यक्षपदी पुण्यातील पुष्पा हेगडे यांची निवड झाली आहे. हेगडे या सर्वाधिक मतांसह संघटनेच्या उपाध्यक्षपदी निवड झालेल्या पहिल्या व्यक्ती आहेत. गेल्या २५ वर्षांपासून संघटनेत कार्यरत असून यापूर्वी त्यांनी सल्लागार, समन्वयक, एशिया पॅसिफिक विभागाचे अध्यक्षपद भूषविले आहे. आयसीडब्ल्यू ही १३० वर्षे जुनी संघटना असून, ती ६७ देशांशी संलग्न आहे. संघटनेचे मुख्यालय पॅरिस येथे असून, आरोग्य, जनकल्याण, शांतता, समानता, शिक्षण, पर्यावरण, स्थलांतर, हिंसाचार, भेदभाव, तस्करी, गरिबी, महिला, मुले, निर्वासित आणि अल्पसंख्याक नागरिकांचे अधिकार या मुद्द्यांवर ही संघटना संयुक्त राष्ट्रसंघासमवेत काम करते.

### सोसायटीधारकांकडून उपोषणाला वाढता पाठिंबा

# नऱ्हे येथील नागरी समस्यांसाठी राष्ट्रवादीचे भूपेंद्र मोरे यांचे आमरण उपोषण

### उपोषणाच्या दुसऱ्या दिवशी प्रशासनाकडून कोणतीच दखल नाही

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी

नऱ्हे, आंबेगाव ही गावे पालिका हद्दीत समाविष्ट झाली आहेत. मात्र, येथील स्थानिक नागरिक अजून देखील मूलभूत नागरी सुविधांसाठी झगडत असताना महानगरपालिका प्रशासन अजूनही आपली उदासीनता सोडण्यास तयार नसल्याने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सरचिटणीस भूपेंद्र मोरे यांचे आमरण उपोषणाला सुरुवात केली आहे. उपोषणाच्या दुसऱ्या दिवशी प्रशासनाकडून कोणतीच दखल घेण्यात आलेली नाही त्यामुळे प्रशासनाचा ढिम्म कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आलेला पाहायला मिळत आहे.

महानगरपालिकेच्या घटनेनुसार व मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ज्या भागात पिण्याच्या व सांडपाण्याची व्यवस्था नाही त्या ठिकाणी मोफत पाणी पुरवठा करण्यासाठी टँकरची तातडीने व्यवस्था करावी. सध्या नऱ्हे परिसरात पालिकेची कोणतीच पाणी पुरवठा करणारी सक्षम यंत्रणा उपलब्ध नसल्यामुळे दररोज ३०० टँकर पाण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. त्यामुळे पालिकेने तातडीने सुमारे ३०० टँकरची मोफत व्यवस्था करावी हि प्रमुख मागणी जोर धरत आहे.




नऱ्हे, आंबेगाव भागात कचरा समस्या मोठी असून अनेकदा कचरा रस्त्यावरच पडलेला असतो. ग्रामपंचायत असताना खाजगी कचरावेचक कंत्राटदार ३० ते ४० रुपयांमध्ये कचरा संकलन करत असतं मात्र, सध्या दिलेल्या कंत्राटनुसार प्रत्येक घराला सुमारे ८० रुपयांची वसुली केली जात आहे, हे तातडीने थांबविण्यात येवून जुन्याच कंत्राटदाराला ग्रामपंचायत दरानेच कचरा संकलन करण्याची परवानगी द्यावी.

या भागातील रस्त्यांची देखील दुरवस्था झाली असून यात प्रामुख्याने कुमार ओंकार, प्रज्वल अशा सोसायट्यांसाठी रस्त्याच्या समस्येबाबत तातडीने उपाय योजना करण्यात याव्यात. तसेच गुंठेवारी बाबत दंडामध्ये सवलत देवून प्रशासनाने टाकलेल्या जाचक अटींबाबत चर्चा करणे करून त्यावर योग्य तो तोडगा काढणे अपेक्षित आहे. नाले सफाई अर्धवट स्थितीमध्ये आहे त्यामुळे या परिसरात डासांची मोठ्या प्रमाणात पैदास होत असून यामुळे मलेरिया सारख्या गंभीर आजाराची लागण होऊ शकते त्यामुळे तातडीने सर्व नाले साफ करण्यात यावेत.

समाविष्ट गावामध्ये मूलभूत नागरी सुविधा उपलब्ध होत नाही तोपर्यंत महानगरपालिकेने शासनाच्या २० टक्के दराने कर वसुली करावी. कोणत्याही सुविधा या भागात उपलब्धता नसताना देखील अशा प्रकारे कराचे संकलन करणे जाचक असल्याचे मोरे यांनी

#### आमरण उपोषणास विविध क्षेत्रातुन वाढता पाठिंबा

☛ अनेकदा पाठपुरावा करून देखील प्रशासन आपली जबाबदारी योग्यरीत्या पार पाडत नसल्याने यापूर्वी देखील अनेकदा आंदोलनाच्या, निवेदनाच्या माध्यमातून नऱ्हे, आंबेगाव येथील नागरिकांनी आपल्या समस्या मांडल्या होत्या. यावेळी भूपेंद्र मोरे यांनी सुरू केलेल्या आमरण उपोषणाला परिसरातील स्थानिक नागरिक, सोसायट्या, समाजसेवक, उद्योजक, यांनी आपला पाठिंबा दर्शविला आहे. त्याबरोबरीने दुसऱ्या दिवसापर्यंत सुमारे ५० पेक्षा जास्त रहिवासी सोसायटीनी आपल्या समस्यांचे पत्र भूपेंद्र मोरे यांना दिले आहे.

### पुण्यातील संतापजनक घटना

# अपंग मुलाला बरं करतो म्हणत मुलाच्या आईसोबत मांत्रिकाचं विकृत कृत्य

### पुण्यातील हडपसर भागात राहणाऱ्या 36 वर्षीय महिलेवर मांत्रिकाचा बलात्काराचा प्रयत्न

पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी

पुण्यातील हडपसर भागात राहणाऱ्या ३६ वर्षीय महिलेवर एका मांत्रिकाने बलात्कार करण्याचा प्रयत्न केल्याची संतापजनक घटना घडली आहे. दिव्यांग मुलाला बरं करतो, तुमच्याकडे खूप पैसा येईल अशा प्रकारचे आमिष दाखवत आरोपीनं विकृत कृत्य केलं आहे. या प्रकरणी आरोपी मांत्रिकासह एका महिलेविरोधात जादूटोणा प्रतिबंधक कायदा, विनयभंग आणि बलात्कार करण्याचा प्रयत्न अशा कलमाअंतर्गत हडपसर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. धनंजय गोहाड ऊर्फ नाना असं अटक करण्यात आलेल्या आरोपी मांत्रिकाचं नाव आहे. तर आरोपी महिला सुरेखा जमदाडे हीचा शोध सुरू आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित महिलेचा मुलगा दिव्यांग आहे. तो इतर मुलाप्रमाणे असावा, यासाठी त्याच्यावर उपचार सुरू होते. तर दुसरीकडे त्यांच्या घरची आर्थिक परिस्थितीही ठीक नव्हती. आर्थिक परिस्थिती सुधरावी यासाठी पीडित महिलेचा प्रयत्न सुरू होता.

अविनाश भोसले: अभिनेत्री अँजेलिना जोलीचा पाहुणचार करणारा पुणेकर सीबीआयच्या ताब्यात; त्यांची



आर्थिक भरभराट पाहून व्हाल थक्क

दरम्यान, आरोपी महिला सुरेखा जमदाडे हिच्यासोबत पीडित महिलेची ओळख झाली. पीडित महिलेची अडचण लक्षात आल्यानंतर आरोपी महिला जमदाडे यांनी पीडितेला आरोपी मांत्रिक धनंजय गोहाड ऊर्फ नाना यांच्याकडे आणलं. तुमचा मुलगा लवकर बरा होईल, तुमच्या पतीकडे खूप पैसे येतील, पण यासाठी दर मंगळवारी मुलाला कडू लिंबाच्या पाल्याने आंघोळ घालत जावा, अकरा सोमवार दूध भात एकत्रित शिजवून त्याचे लेपन पिंडीला करायचे, प्रत्येक पोर्णिमेला मुलावरुन लिंबू उतरून टाकायचे आणि काळी बाहुली दरवाजाला बांधायची, तर शनिवारी दही, भात, उडदाची काळी डाळ, गुलाल हे मुलावरुन उतरून टाकण्यास सांगितले. मांत्रिक धनंजय गोहाड ऊर्फ नाना याने सांगितल्याप्रमाणे सर्व उपाय वेळोवेळी केले. पण तरीही मुलामध्ये आणि घरच्या परिस्थितीत काही फरक पडला नाही. तुमच्या घरातील नकारात्मक शक्ती बाहेर काढावी लागेल. ते सर्व विधी तुमच्या घरी येऊन करावे लागतील, असं आरोपी मांत्रिक धनंजय गोहाड यानं पीडित महिलेला सांगितलं. त्यानुसार आरोपी मांत्रिक आणि आरोपी महिला दोघंही पीडित महिलेच्या घरी गेले. आरोपींनी पीडितेच्या अंगावरील सर्व कपडे काढून तिच्या अंगाला रक्तचंदनामध्ये लिंबू पिळलेला लेप लावला. एवढे सर्व उपाय करून देखील कोणत्याही फरक पडला नाही. त्यामुळे पीडित महिलेने आरोपी मांत्रिक धनंजय गोहाड ऊर्फ नानाकडे विचारणा केली.

#### मांत्रिक धनंजय गोहाड ऊर्फ नाना यास अटक

याबाबत कोणालाही काही सांगितल्यास, तुझा पती मरेल, दुसरा मुलगा देखील दिव्यांग होईल. तुझा संसार उद्ध्वस्त होईल आणि भावाचा अपघात होईल, अशी धमकी दिली. आरोपी मांत्रिक एवढ्यावरच थांबला नाही. तर त्याने पीडितेला घाणेरडे मेसेज आणि व्हिडीओ पाठवले. अखेर पीडित महिलेनं हडपसर पोलिसांकडे धाव घेतली. त्यानंतर पोलिसांनी गुन्हा दाखल करत आरोपी मांत्रिक धनंजय गोहाड ऊर्फ नाना यास अटक केली.

## शॉर्ट न्यूज »

### जास्त परताव्याचे आमिष दाखवून एकाची 43 लाखांची फसवणूक




।पिंपरी चिंचवड ।महाईन्यूज । प्रतिनिधी ।

आमच्या फर्ममध्ये गुंतवणूक केल्यास जास्त परतावा मिळेल असे आमिष दाखवून एकाची 43 लाख 57 हजारांची फसवणूक करण्यात आली. हा प्रकार 23 जानेवारी 2021 ते 24 फेब्रुवारी 2022 या कालावधीत पिंपळे निलख येथे घडला. विक्रांत विजय भोसले (वय 38, रा. पिंपळे निलख) यांनी याप्रकरणी वाकड पोलीस ठाण्यात शनिवारी (दि. 28) फिर्याद दिली आहे. त्यानुसार रायन पोप (रा. हांडेवाडी, हडपसर) याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने फिर्यादी सोबत असलेल्या ओळखीचा फायदा घेऊन फिर्यादी यांना त्याच्या फर्ममध्ये गुंतवणूक केल्यास तो इतर गुंतवणूकदारांपेक्षा जास्त परतावा देतो असे सांगून फिर्यादीचा विश्वास संपादन केला. 18 मे 2021 ते 24 फेब्रुवारी 2022 या कालावधीत त्याने फिर्यादीकडून 69 लाख 30 हजार 500 रुपये घेतले.

### भोसरीत देशातील सर्वात मोठी बैलगाडा शर्यत...

# बैलांनाही खेळावसं वाटतं; शर्यतींना विदेशातून लगाम घालण्याचा प्रयत्न!

### केंद्रीय मंत्री आणि भाजप नेते प्रकाश जावडेकर यांचा दावा

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

बैलगाडा शर्यत हे भारताचे सांस्कृतिक वैभव आहे. त्याला लगाम घालण्याचा प्रयत्न देशातील आणि विदेशातील काही शक्ती करीत आहेत, असा दावा माजी केंद्रीय मंत्री आणि भाजप नेते प्रकाश जावडेकर यांनी रविवारी (ता.२९) पिंपरी-चिंचवडमध्ये भोसरीत केला. त्यांचा रोख हा या शर्यतीला न्यायालयात आव्हान देणारे प्राणीप्रेमी व त्यांच्या संघटनांकडे होता. ते एकही बैल पाळत नसल्याची कोपरखळीही त्यांनी मारली.

बैलगाडा शर्यत सुरु होण्यासाठी आपण अध्यादेश काढला व तो न्यायालयात टिकलाही, असे जावडेकर म्हणाले. ही संस्कृती टिकली पाहिजे, जोपासली पाहिजे, त्यासाठी शर्यतीच्या अटी आणि न्यायालयाच्या नियमांचेही पालन केले पाहिजे, असे ते म्हणाले. भोसरीचे भाजप आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने पिंपरी-चिंचवडचे माजी महापौर राहुल जाधव व नितीन काळजे यांनी टाळगाव चिखली येथील रामायण मैदानावर भरविलेल्या देशातील सर्वात मोठ्या बैलगाडा शर्यतीला भेट दिली त्यानंतर जावडेकर बोलत होते. त्यांनी व राज्याचे माजी मंत्री सदाभाऊ खोत यांनी पाच दिवस चालणाऱ्या या शर्यतीला तिसऱ्या दिवशी (रविवारी)भेट दिली.

प्राण्यांना धावायचं नसतं, त्याला शर्यत आवडत नाही, हे तुम्हाला कुठल्या बैलाने लिहून दिलंय, असा टोला जावडेकरांनी बैलगाडा शर्यतींना विरोध करणाऱ्यांना लगावला. माणसं खेळतात, प्राणी खेळतात, मग बैलाला खेळावसं वाटलं तर त्यात बिघडलं कुठं, असे ते म्हणाले.



### 'ढाण्या वाघा'ने शेतकऱ्यांचा सन्मान केला : सदाभाऊ खोत

बैलगाडा ही शेतकऱ्यांची संस्कृती आहे. गावगाड्यात राबणारा शेतकरी बैलांना जीव लावतो. देशी गायीच्या पोटाला जे खोंड येते. त्याला बैलगाडा घाटात पळवले जाते. त्यातून मिळणारे उत्पन्न हे त्या शेतकऱ्याला जणू पाच एकर शेती एकाच वर्षी पिकावी, असे असते. त्यासाठी देशी गाय, गोवंश वाचला पाहिजे म्हणून महाराष्ट्राच्या मातीतील सुपुत्र प्रकाश जावडेकर दिल्लीच्या तख्तावर सह्याद्रीसारखे शेतकऱ्यांच्या पाठिशी उभा राहीले. दुसऱ्या बाजुला बैलगाडा शर्यतींवर बंदी आल्यानंतर आमदार महेश लांडगे यांनी अविरत श्रम घेतले. विधानसभा सभागृहात विधेयक आणले. शर्यतींवरील बंदी उठवली आणि पुन्हा उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालयातही लढा उभा केला. महेश लांडगेंसारख्या ढाण्या वाघाने महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना न्याय मिळवून दिला. एव्हढेच नव्हे, तर भारतातील सर्वात मोठी बैलगाडा शर्यत भरवून शेतकऱ्यांचा खऱ्या अर्थाने सन्मान केला, अशा शब्दांत राज्याचे माजी मंत्री सदाभाऊ खोत यांनी कौतूक केले.

# बिल्डरला सव्वानऊ कोटी रुपयांची खंडणी मागणाऱ्या पीएचडी धारकाला बेड्या

## सोनिगरा बिल्डरकडून सव्वानऊ कोटी रुपयांची खंडणी मागितली होती

पिंपरी । महाईन्यूज

शिक्षण एमबीए, एमकॉम, पीएचडी आणि धंदा ब्लॅकमेलर असं सांगितलं तर आश्चर्य वाटेल. पण, तसं घडलं आहे. अशा पीएचडीधारक उच्चशिक्षीत आरोपीला पिंपरी-चिंचवड पोलिसांनी खंडणीच्या गुन्ह्यात बेड्या ठोकल्या आहेत. शहरातील प्रसिद्ध सोनिगरा बिल्डरकडून त्याने सव्वानऊ कोटी रुपयांची खंडणी मागितली होती. त्यातील पहिला दोन कोटींचा हफ्ता चेक स्वरुपात घेताना त्याला नुकतेच (ता.२७) रंगेहाथ पकडण्यात आले.

आदिनाथ भुजाबळी कुचनूर (वय ५४, रा. थेरगाव) असे या उच्चशिक्षित आरोपीचे नाव आहे. त्याच्याविरुद्ध न्यायाधीशांच्या नावे खोटी कागदपत्रे तयार करणे, आर्किटेक्टला बदनाम



करणे, बिल्डरांना ब्लॅकमेल करणे, पालिका अधिकाऱ्यांविरुद्ध खोटे आरोप करणे याबद्दल शिवाजीनगर, पुणे येथे दोन, तर पिंपरी-चिंचवडमध्ये सांगवी आणि पिंपरी पोलिस ठाण्यात चार गुन्हे दाखल आहेत.

**किडक्या डोक्याच्या लोकांनी स्क्रीप्ट तयार करून शाहू महाराजांना दिली! फडणवीसांचा पलटवार**

तो दोन वर्षे येरवडा तुरुंगात शिक्षा भोगून आलेला आहे. आता पाचवा खंडणीचा गुन्हा वाकड पोलिस ठाण्यात नोंद झाला. त्यात त्याला १ जूनपर्यंत पोलिस कोठडी मिळाली आहे. पुणे, मुंबईतील अनेक बिल्डरांना ब्लॅकमेल करीत त्याने खंडणी उकळली असल्याचे पोलिसांच्या प्राथमिक चौकशीत आढळले आहे. तसेच त्याची सल्लागार फर्मही बोगस निघाली आहे.

शहरातील प्रसिद्ध बिल्डर सोनिगरा रियलकॉनचे केतूल भागचंद सोनिगरा (वय ४१, रा. निगडी प्राधिकरण) यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. त्यांचा डांगे चौक, थेरगाव येथे सिग्नेचर पार्क हा तीनशे सत्तर कोटी रुपयांचा बांधकाम प्रोजेक्ट सुरु आहे. त्यासाठी आवश्यक त्या सर्व परवानग्या घेण्यात आल्या आहेत. तरीही त्यात खूप त्रूटी आहेत, तुम्ही प्राप्तीकर चुकवित आहात, तुमच्याविरोधात तक्रार करतो, असे कुचनूरने सोनिगरा यांना पत्र पाठवून धमकावले होते.

### खंडणीविरोधी पथकाला कारवाईचा आदेश

या अडचणीतून बाहेर पडण्यासाठी आपल्या अरहाम आर. ई. कन्सलटन्सी सर्व्हिसेस या सल्लागार फर्मची सेवा घेण्यास सांगितले होते. त्याबदल्यात प्रकल्प खर्चाच्या अडीच टक्के म्हणजे सव्वानऊ कोटी रुपयांची मागणी त्याने केली होती. त्यामुळे सोनिगरा यांनी पोलिस आयुक्त अंकुश शिंदे यांच्याकडे तक्रार केली. त्यांनी तिची शहानिशा करून कारवाईचा खंडणीविरोधी पथकाला आदेश दिला.

त्यानुसार या व गुंडाविरोधी पथकाने सोनिगरा यांच्या कार्यालयात सापळा लावला. त्यात परवा दोन कोटी खंडणीचा पहिला हफ्ता घेण्यासाठी आलेला कुचनूर अडकला.खंडणीविरोधी पथकाचे सिनिअर पीआय अजय जोगदंड,गुंडाविरोधी पथकाचे एपीआय हरीश माने व त्यांच्या पथकांनी ही कारवाई सीपी शिंदे, डीसीपी काकासाहेब डोळे, एसीपी (क्राईम) पद्माकर घनवट, प्रशांत अमृतकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई झाली.

दरम्यान, विविधप्रकारे खंडणी मागणाऱ्या व्यक्ती समाजात वावरत असतात. त्यांच्याविरुद्ध सोनिगिरा यांच्याप्रमाणे हिमतीने पुढे येऊन जवळच्या पोलिस ठाण्यात तक्रार करावी. तेथे काही अडचण आल्यास पोलिस आयुक्त कार्यालयाशी संपर्क साधावा,असे आवाहन पोलिस आयुक्त अंकुश शिंदे यांनी पिंपरी-चिंचवडकरांना केले आहे.

## सेल्समन तरुणाने 61 हजारांचा ऐवज पळवला

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज ।

जुन्या साड्या घेऊन त्या बदल्यात प्लास्टिक भांडी देणा-या एका तरुणाने घरात येऊन घरातून सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम असा 61 हजार 560 रुपयांचा ऐवज चोरून नेला. ही घटना 22 मे रोजी दुपारी रुपीनगर तळवडे येथे घडली. संजय मलाकांत भारे (वय 26, रा. काळेवाडी) असे गुन्हा दाखल झालेल्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी जिजा सुरेश सिरसाठ (वय 52, रा. रुपीनगर, तळवडे) यांनी चिखली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी हा जुन्या साड्या घेऊन त्या बदल्यात प्लास्टिक भांडी देण्याचा व्यवसाय करतो.

## संपादकीय »

# ओबीसी आरक्षणाचा सावळागोंधळ !

***ओबीसीच्या राजकीय आरक्षणाच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयासमोर सुरु असलेल्या सुनावणी संदर्भात महाराष्ट्र सरकारने नव्याने दिलेला राज्य मागासवर्गीय आयोगाचा अहवाल सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावला.***

राज्य सरकारचे सर्वोच्च न्यायालयाने कान टोचल्यानंतर उशिरा का होईना मागासवर्गीय आयोगाची स्थापना करून त्याद्वारे आयोग नेमून इम्पेरिकल डेटा पुरवण्याची तयारी दर्शवली आहे. तो अहवाल उशिरा दाखल करून कोर्टाचे समाधान न झाल्याने ओबीसी घटकांच्या राजकीय आरक्षणावर गदा आलेली आहे. न्यायालयाचे जोपर्यंत सरकार समाधान करत नाही , तोपर्यंत ओबीसी आरक्षण महाराष्ट्रात पूर्ववत होणे कठीण आहे. वस्तुनिष्ठ माहितीचा अहवाल कसा तयार करायचा याबाबत सरकारी भूमिकेमध्ये गोंधळ असल्याचे प्रसार माध्यमातून स्पष्टपणे दिसून येते. ओबीसीच्या राजकीय आरक्षणाच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयासमोर सुरू असलेल्या सुनावणी संदर्भात महाराष्ट्र सरकारने नव्याने दिलेला राज्य मागासवर्गीय आयोगाचा अहवाल सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावला. त्यानंतर तात्काळ पंचायतराज संदर्भातील निवडणुका घेण्याचे आदेश दिले आहेत. दुसरीकडे मध्य प्रदेश सरकारने दिलेला मागासवर्गीय आयोगाचा अहवाल सर्वोच्च न्यायालयाने मान्य करून मध्य प्रदेशामध्ये निवडणुकीस ओबीसी आरक्षणासह निवडणुका घेण्यास हिरवा कंदील दाखवलेला आहे. खरंतर महाराष्ट्रामध्ये ओबीसी आरक्षणाशिवाय निवडणुका घेण्याचे जवळ-जवळ निश्चित झाले असताना मध्य प्रदेशच्या निकालामुळे पुन्हा महाराष्ट्राला ओबीसी आरक्षणानुसार निवडणुका घेता येतील का ? याबाबत आशा पल्लवित झाली आहे. मध्य प्रदेश सरकारच्या बाबतीत दिलेला आदेश जसाच्या तसा महाराष्ट्रात लागू करता येईल का? की महाराष्ट्राला सुद्धा मध्य प्रदेश सरकारप्रमाणे इम्पेरिकल डेटा (अनुभवजन्य वस्तुनिष्ठ माहिती अहवाल) सर्वोच्च न्यायालयात दाखल केल्याशिवाय व तो शाबीत करून दिल्याशिवाय ओबीसी आरक्षण पूर्ववत करता येईल का? याबाबत लेखांमध्ये आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.मागील वर्षी नागपूर, अकोला वाशीम, भंडारा जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकीत 50 जास्त आरक्षण दिले गेल्यामुळे त्या विरोधात विकास खंडेराव गवळी वि. महाराष्ट्र सरकार या जनहित याचिकेत सर्वोच्च न्यायालयाने जिल्हा परिषद निवडणुकीतील 27 पेक्षा ओबीसीना जास्तीचे आरक्षण रद्द केले.



## आनंदी सकाळ

# शास्त्रविरुद्ध कर्म करू

प्रपंच देवाचा मानून अभिमानरहितपणे तो करणे हा परमार्थ. परमेश्वराचे स्मरण ठेवून तोच कर्ता आहे असे मानणे, आणि सर्व काही त्याच्याकरिता करणे, म्हणजे देवाला अर्पण केल्यासारखेच आहे. फक्त कर्माच्या शेवटीच कृष्णार्पण म्हणणे, म्हणजे इतर वेळ त्याला विसरला असे नाही का होत? देवापाशी 'मला तू आपला म्हण. हे मन तुझ्या चरणी अर्पण केले. मला तुझ्याजवळ काहीही मागण्याची इच्छा न होवो.' असे मागावे. नाही तर, जो राज्य द्यायला समर्थ आहे त्याच्याजवळ केरसुणी मागितल्याप्रमाणे होईल. भगवंताची मनापासून प्रार्थना करावी. आपल्याला तो बरोबर मार्ग दाखवितो. आपण अंधारामध्ये वाट चालत असताना एक क्षणभरच वीज चमकते, परंतु त्यामुळे पुढचा सगळा रस्ता आपल्याला दिसतो. त्याचप्रमाणे, मनापासून भगवंताचे स्मरण केले तर पुढच्या मार्गाचे आपल्याला आपोआप ज्ञान होते. 'तू जे देशील ते मला आवडेल,' असे आपण भगवंताला सांगावे आणि भगवंताचे अखंड स्मरण ठेवावे. यापेक्षा भगवंताजवळ जायला दुसरा मार्ग कोणता असणार?अमुक एक हवे किंवा अमुक एक नको असे न वाटणे याचे नाव वैराग्य. संकटकाळी, हे संकट नसावे असे न वाटता, परमेश्वराचे स्मरण असावे आणि त्याच्याजवळ हे मागावे की, 'देवा तुझ्याजवळ काहीही मागण्याची इच्छा देऊ नको.'

# चंचल मनावर नियंत्रण अन् उद्योजकता व्यवस्थापन



## भूमिका



1. छत्रपती शिवाजी महाराज : छत्रपती शिवाजी महाराज हे अखंड हिंदुस्थानचे आराध्य दैवत आहे. त्यांनी अतिशय कठीण परिस्थितीत स्वराज्याची स्थापना केली. शून्यातून विश्व निर्मिती, कामाचे नियोजन, आहे त्या परिस्थितीत लोकांच्या क्षमता ओळखून त्यांना प्रशिक्षण देऊन जबाबदारी सोपवणे, अन्याय करणाऱ्या विरुद्ध कडक कारवाई, गनिमीकावा, स्त्रियांचा आदर, संयम, वेळ प्रसंगी अनेक तह केले. उद्योजकाला सुद्धा वेळोवेळी अनेक तह करावे लागतात, बदल करावे लागतात, बदलाला सामोरे जावे लागते. कर्मकांडाला फार महत्व दिले नाही, राजेंच्या मोठ्या लढाया ह्या अमावश्या च्या दिवशी झाल्या व त्यांनी त्या जिंकल्यासुद्धा आहेत.2)भगवद्गीता : मनाचे नियंत्रण, मनाचे सामर्थ्य यासाठी भगवद्गीता खूप महत्वाची आहे. सर्व युद्धकलेत पारंगत असा धनुर्धारी अर्जुनाचे गांडीव धनुष्यसुद्धा खाली गळून पडले जेव्हा रणांगणावर त्याच्यासमोर भाऊ, काका आणि नातेवाईक होते व त्यांच्याशी युद्ध करायचे होते. उद्योग व्यवसायातील सर्व स्किल तुमच्याकडे आहे, तुम्ही खूप ज्ञानी हुशार आहात, तरी पण तुमच्या मनाचा ताबा जर भावनिक गोष्टींनी घेतला तर तुमचा उद्योग व्यवसाय यशस्वी होणार नाही. तुमच्या मनावर जर तुमचे नियंत्रण नसेल तर कुठलेही युद्ध तुम्हाला जिंकता येणार नाही. उद्योजकता एक युद्धच आहे ते जर जिंकायचे असेल तर तुम्हाला तुमच्या मनावर नियंत्रण हवेच. जेव्हा कधी तुम्ही भावनिक झाले असाल तेव्हा तुम्हाला अर्जुनाला आठवावे लागेल आणि भगवान श्रीकृष्ण यांनी अर्जुनाला मनावर नियंत्रण कसे ठेवायचे हे शिकवले व युद्ध जिकंलेही.हरिपाठातील अठराव्या अभंगात सुद्धा ज्ञानेश्वर महाराज सांगतात, मनोमार्गे गेला तो तेथेचि मुकला हरिपाठी स्थिरावला तोचि धन्य, चंचल मनाला काबूत करून त्याची स्थिरता करणे हे महत्वाचे काम तुम्ही तुमच्या उद्योग व्यवसायात करायचे आहे. भगवान श्री कृष्णाने कर्मयोगाला फार महत्व दिलेले आहे.

# एक पाऊल मुक्तीचे !

**पुनर्वसनाच्या नावाखाली बळजबरीने महिलांना महिला वसतीगृहामध्ये डांबून ठेवू नये असे आदेश दिले आहेत. तसेच देह व्यवसायातील महिलांच्या हक्का संदर्भात विधी सेवा प्राधिकरण यांनी पोलीस आणि महिलामध्ये जनजागृती करावी, असे आदेश दिले आहेत.**



देहविक्री बेकायदेशीर नाही, हा सर्वोच्च न्यायालयाने देह व्यवसायाविषयी जो नुकताच आदेश दिला आहे, तो विविध दृष्टीने अत्यंत महत्वाचा आहे. त्यात पोलिसांच्या अयोग्य हस्तक्षेपाला आळा घातला आहे, तसेच पुनर्वसनाच्या नावाखाली बळजबरीने महिलांना महिला वसतीगृहामध्ये डांबून ठेवू नये असे आदेश दिले आहेत. तसेच देह व्यवसायातील महिलांच्या हक्का संदर्भात विधी सेवा प्राधिकरण यांनी पोलीस आणि महिलामध्ये जनजागृती करावी, असे आदेश दिले आहेत. सर्वात महत्वाचे म्हणजे देह व्यवसायाकडे व्यवसाय म्हणून बघावं असं स्पष्ट म्हटलं आहे. ह्या आदेशामुळे ह्या व्यवसायातील महिलांवर, पोलीस आणि न्याय व्यवस्थेकडून होणारे अन्याय कमी होतील, अशी आशा नक्कीच निर्माण झाली आहे.देहव्यवसाय म्हटले की अनेकांच्या भुवया उंचावतात. राष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्थेच्या मते भारतात 6 लाख 37 हजार पाचशेहून जास्त लैंगिक कामगार आहेत. पण एक दुर्लक्षित वर्ग म्हणून ह्या महिला खूप अन्याय सहन करत आहेत. एका रात्रीत सर्व बदलणार नाही हे खरे असले तरी एक माणूस म्हणून आपला दृष्टिकोन बदलल्यास समाजात मोठे बदल घडतील. २७ मे रोजी सर्वोच्च न्यायालयाचा वेश्या व्यवसायाला धरून एक निर्णय आला आणि हवाच बदलली. काही वर्षांपूर्वी पश्चिम बंगालमध्ये एक खुनाची केस होती. बुद्धदेव कर्मासकर विरुद्ध पश्चिम बंगाल राज्य, जी सर्वोच्च न्यायालयाने स्वतःहून जनहित याचिकेमध्ये परावृत्त केली. ही खुनाची केस एका वेश्याव्यवसायातील महिलेची होती आणि ज्याने खून केला होता त्याचं म्हणणं होतं की ह्या महिलेचा खून करून मी समाजातील घाण दूर केली आहे आणि त्यामुळे मला शिक्षा देण्याचा प्रश्नच येत नाही. ह्या केसमुळे न्यायालयाला ह्या विषयाचे गांभीर्य कळले आणि त्यांनी ह्या जनहित याचिकेची सुनावणी सुरू केली. त्यासाठी एक पॅनल गठीत करण्यात आलं आणि त्या पॅनलवर वेश्याव्यवसायातील महिलांची संघटना पण एक सदस्य म्हणून नेमण्यात आली, ज्या गोष्टीला खूप विरोध झाला, पण न्यायालयाने समितीवरच त्यांचं सदस्यत्व कायम ठेवलं.

## ।। अभंगवाणी ।।



एका जिवें आतां जिणें जालें दोहीं ।
वेगळीक कांहीं नव्हे आतां ॥१॥
नारायणा आम्हां नाहीं वेगळीक ।
पुरविली हे भाक सांभाळिली ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज »

### मुंबईतील उत्तर भारतीयांचा राज ठाकरेंना पाठिंबा



। मुंबई । महाईन्यूज ।

राज ठाकरे यांच्या अयोध्या दौऱ्याला उत्तर प्रदेशचे भाजप खासदार बृजभूषण सिंह यांचा विरोध होता. राज ठाकरे यांनी उत्तर भारतीयांची माफी मागावी तरच त्यांना अयोध्येत पाऊल ठेवून देऊ असे बृजभूषण सिंह यांनी म्हटलं होते. परंतु बृजभूषण यांच्याविरोधात आता उत्तर भारतीय एकवटले आहेत. राज ठाकरेंना पाठिंबा दिला आहे. बृजभूषण मुंबईत आले तर त्यांना चप्पलांचे हार घालू असे उत्तर भारतीय संघटनेकडून सांगण्यात आले आहे. संघटनेने बृजभूषण सिंह यांच्याविरोधात घोषणाबाजी केली आहे.

### अमरावतीत रॅलीच्या आयोजकांवरसुद्धा गुन्हा दाखल

# राणा दाम्पत्याला स्वागत रॅली भोवली!

## राणांसह शंभरपेक्षा अधिक कार्यकर्त्यांवर गुन्हा दाखल

। नागपूर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**अमरावतीच्या** खासदार नवनीत राणा आणि आमदार रवी राणा यांच्याविरोधात दोन ठिकाणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर 100 पेक्षा अधिक कार्यकर्त्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुंबईत हनुमान चालीसा पठणावरुन घडलेल्या नाट्यमय घडामोडीनंतर नवनीत राणा आणि रवी राणा मुंबई-दिल्लीनंतर 36 दिवसांनी अमरावतीमध्ये परतले, यावेळी त्यांचे स्वागत करण्यात आले परंतु ही स्वागत रॅली राणा दाम्पत्याला भोवली आहे. रॅलीच्या आयोजकांवरसुद्धा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

राणा दाम्पत्य आणि शिवसेना यांच्या वादानंतर राणांच्या अमरावतीमध्ये अडचणी वाढल्या आहेत. रवी राणा आणि नवनीत राणा यांचे अमरावतीमध्ये मोठ्या जल्लोषात आगमन करण्यात आले. यावेळी त्यांच्या समर्थकांनी स्वगतासाठी मोठी गर्दी केली होती. तसेच त्यांच्यासाठी मोठा पुष्पहार करण्यात आला होता. यासाठी एक क्रेन वापरण्यात आली होती. तसेच रात्री दहा नंतर स्पीकर्स लावण्यात आले होते. परवानगी नसताना कार्यकर्त्यांनी स्पीकर्स सुरु ठेवले असल्यामुळे त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



राणा दाम्पत्याच्या घरासमोर असलेल्या रोडवर स्टेज उभारण्यात आला होता. रस्त्यावर अडथळा निर्माण केला होता. मध्यरात्रीपर्यंत स्पीकर्स लावून नियमांचे उल्लंघन केल्यामुळे गुन्हा दाखल झाला आहे. राजापेठ पोलीस स्टेशनमधील पोलीस निरीक्षक स्वाती पवार यांच्या तक्रारीवरुन 341, 188, 134, 135 कमल 15 पर्यावरण संवर्धन अधिनियम 1986 आयपीसी अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राणा दाम्पत्यावर यापूर्वी मुंबईत गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यांना अटक करण्यात आली होती. दरम्यान अटकेमधून सुटका मिळाल्यानंतर त्यांनी दिल्ली गाठली होती. दिल्लीतून अमरावतीमध्ये दाखल झाल्यामुळे समर्थकांनी स्वागत रॅली काढली होती.

### सामाजिक कार्यक्रमाला परवानगी लागत नाही – रवी राणा

मोठ्या प्रमाणात रामायण वाचले जातात, हनुमान चालीसाचे पठण होत असते. त्या प्राचीन मंदिरात हनुमान चालीसाचे वाचन केले. ज्या मंदिरात 24 तास हनुमान चालीसा पठण केले जाते त्या ठिकाणी आम्ही हनुमान चालीसा पठण केले आहे. त्यासाठी कोणाची परवानगी लागत नाही. आम्ही गुन्हा केला नाही. आमच्या घरी अनेक लोकांनी दुग्धाभिषेक केला आहे. घरगुती कार्यक्रमासाठी परवानगीची गरज नसते. मुद्दाम आमच्यावर गुन्हे दाखल करणं, आम्हाला रॅलीची परवानगी दिली नाही असे रवी राणा म्हणाले आहेत.

## सुप्रिया सुळेंना घरी जा, स्वयंपाक करा म्हणणाऱ्या चंद्रकांत पाटलांचा माफिनामा, पत्रातून दिलगिरी व्यक्त

। कोल्हापूर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी चौफेर टीकेचा सामना केल्यानंतर राज्य महिला आयोगाला पत्र लिहून दिलगिरी व्यक्त केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्यावर टीका करताना घरी जा आणि स्वयंपाक करा असे चंद्रकांत पाटील म्हणाले होते. पाटलांच्या या वक्तव्यावरुन त्यांच्यावर टीकास्त्र डागण्यात आले होते. हे प्रकरण राज्य महिला आयोगापर्यंत पोहोचलं होते. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी दखल घेतली होती. परंतु चंद्रकांत पाटील यांनी थेट राज्य महिला आयोगाला पत्र लिहून दिलगिरी व्यक्त केली आहे. मी त्रागाने केलेल्या उच्चारात सुप्रिया सुळे किंवा समस्त माता-भगिनींचा अपमान झाला असल्यास मी दिलगिरी व्यक्त करतो असे चंद्रकांत पाटील म्हणाले.

भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी खासदार सुप्रिया सुळेंची माफी मागितली आहे.





### चंद्रकांत पाटील पत्रात काय म्हणाले?

▸▸ आयुष्याची ४५ वर्षे सामाजिक, राजकीय जीवनात गेल्यानंतर स्वयंसिद्धा, HELPERS OF THE HANDICAP सावली, आई, संवेदना व वात्सल्य सारख्या संस्थांच्या मागे उभे राहून महिला सबलीकरणासाठी रात्रंदिवस प्रयत्न करणाऱ्या, जगातील सर्वात मोठ्या पक्षाचा प्रदेश अध्यक्ष असणारा मी, ज्या पक्षाच्या महाराष्ट्र विधानसभेत १२ महिला आमदार व देशाच्या लोकसभेत महाराष्ट्रातून ५ महिला खासदार आहेत. मला सुप्रिया सुळेंबद्दल व महिलांबद्दल मनात अनादर नसताना ग्रामीण म्हणीचा वापर केल्यामुळे अपमानित व्हावे लागते यासारखे आयुष्यात दुःख नाही. माझ्या ओबीसी बंधू-भगिनींना राजकीय आरक्षण न मिळाल्यामुळे मी त्रागाने केलेल्या उच्चारात सुप्रिया सुळे किंवा समस्त माता-भगिनींचा अपमान झाला असल्यास मी दिलगिरी व्यक्त करतो. आशा शब्दांत चंद्रकांत पाटील यांनी दिलगीरी व्यक्त केली आहे.

चंद्रकांत पाटील यांनी राज्य महिला आयोगाला पत्र लिहिले आहे. आपण ग्रामीण म्हणीचा वापर केला असल्याचे पाटलांनी सांगितले आहे. चंद्रकांत यांच्या टीकेनंतर राष्ट्रवादी काँग्रेस आणि महाविकास आघाडीतील नेते आणि महिला पदाधिकाऱ्यांनी संताप व्यक्त केला होता. भाजपवर टीकास्त्रा डागण्यात आले होते. चौफेर टीका झाल्यानंतर पाटलांनी माफिनामा सादर केला आहे.

## मला झोपेचा विकार असल्यानेच गांजा घेत होतो, आर्यनची कबुली

### एनसीबीच्या चौकशीदरम्यान आर्यन खानचा डीलर्सशी संपर्क झाला असल्याची माहिती

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।



हिंदी सिनेसृष्टीत यशाच्या शिखरावर पोहोचलेला अभिनेता शाहरुख खान आपला मुलगा आर्यन खानच्या ड्रग्ज प्रकरणामुळे चर्चेत होता. कॉर्डेलिया क्रूझवर झालेल्या छापेमारीमध्ये एनसीबीने ड्रग्जपार्टी संबधित आर्यन खानसह अनेक जणांना अटक केली होती. आर्यन खानला महिनाभर जेलमध्ये राहावे लागले होते. परंतु शुक्रवारी एनसीबीने कोर्टात आरोपपत्र दाखल केले.

ज्यामध्ये आर्यन खान दोषी नसल्याचे समोर आलं आहे. आर्यनकडे कोणतेही ड्रग्ज सापडले नसल्याचे एनसीबीने आरपपत्रात म्हटलं आहे. मात्र 23 वर्षीय आर्यन खानने चौकशीदरम्यान गांजा सेवन केले असल्याचे कबूल केलं आहे. परदेशात शिक्षण घेत असताना गांजा सेवन केल्याचा खुलासा आर्यनकडून करण्यात आला आहे.

### अमेरिकेत शिक्षण घेत असताना गांजाचे सेवन...

▸▸ अभिनेता शाहरुख खानचा मुलगा आर्यन खानला ड्रग्ज पार्टी प्रकरणी मुंबई एनसीबीने अटक केली होती. यावेळी त्याची चौकशी करण्यात आली होती. चौकशीमध्ये आर्यन खानने 2018 रोजी यूएसमध्ये शिक्षण घेत असताना गांजाचे सेवन केल्याचे सांगितले. झोपेचा विकार असल्यामुळे गांजाच्या संपर्कात आलो असे आर्यनने सांगितले आहे. झोपेच्या विकाराबाबत इंटरनेटवर माहिती शोधण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी समजले की, गांजामुळे झोपेच्या विकारासंबंधी आजार बरा होता. यामुळे गांजाचे सेवन केले अशी कबुली आर्यनने चौकशीदरम्यान दिली होती.

## शॉर्ट न्यूज »

### शरद पवारांनी संजय राऊतांसाठी मोदींची भेट घेतली मग मलिकांसाठी का नाही? ओवैसींचा सवाल



। ---- ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

एमआयएमचे प्रमुख असदुद्दीन ओवैसींनी काल भिवंडीतील सभेत पंतप्रधान मोदींसह राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्यावर सडकून टीका केली आहे. शिवसेना खासदार संजय राऊत यांच्यासाठी शरद पवारांनी मोदींची भेट घेतली मग नवाब मलिकांसाठी ही भेट का घेतली नाही असा थेट सवाल ओवैसींनी उपस्थित केला आहे. दरम्यान मुघलांवरून मुस्लिमांना केले जाणार टार्गेट आणि ज्ञानवापी मशीद, ताजमहल मुद्यांवरूनही ओवैसींनी हल्लाबोल केला आहे. दरम्यान मुस्लीमांची ओळख पुसण्याचे प्रयत्न सुरु असल्याचा आरोपही त्यांनी केला. महागाईच्या मुद्द्यावरूनही त्यांनी मोदी सरकारला धारेवर धरले. "शिवसेना खासदार संजय राऊत यांच्यावर कारवाई करु नका, त्यांना जेलमध्ये टाकू नका असे म्हणता, मात्र दुसरीकडे नवाब मलिकांना जेल का जाऊ दिले?

### 19 आसन असलेल्या या विमानात 4 भारतीय, 3 विदेशी आणि 13 नेपाळी प्रवासी

# तब्बल सहा तासांनंतर लागला तारा एअरच्या विमानाचा सुगावा

### 4 भारतीयांसह 22 प्रवासी सुरक्षित

। काठमांडू । महाईन्यूज । प्रतिनिधी।

नेपाळमधून बेपत्ता झालेल्या विमानाचा तब्बल सहा तासांनंतर लष्कराने शोध घेतला आहे. नेपाळच्या लष्कराने दिलेल्या माहितीनुसार, हे विमान हिमालयातील मानापाथीच्या खालच्या भागात दिसले. तसेच हे विमान मुस्तांगच्या कोवांग गावात सापडले. १९ आसन असलेल्या या विमानात ४ भारतीय, ३ विदेशी आणि १३ नेपाळी प्रवासी होते. सर्व प्रवासी सुरक्षित असल्याचं सांगितलं जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, लष्कराच्या अधिकाऱ्यांना दूरवरुन धूर निघताना दिसला, त्यामुळे विमानाचा शोध घेण्यास मोठी मदत झाली. लष्कराचे प्रवक्ते नारायण सिलवाल यांनी सांगितले की, स्थानिक लोकांनी लष्कराला दिलेल्या माहितीनुसार, तारा एअरचे विमान लामचे नदीच्या किनाऱ्यावर हिमालयातील मानापथीच्या खालच्या बाजूस कोसळले होते. नेपाळ लष्कर जमीन, हवाई मार्गाने घटनास्थळी पोहोचत आहेत. खराब हवामानामुळे लष्कराला बचाव




करण्यास अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. तारा एअरच्या दुहेरी इंजिनच्या विमानाने आज सकाळी पोखराहून जोमसोमला उड्डाण केले होते. विमानाशी शेवटचा संपर्क सकाळी ९.५५ मिनिटांनी झाला होता. विमान फक्त १५ मिनिटांच्या उड्डाणावर होते त्यावेळी २२ प्रवासी प्रवास करत होते. तारा एअर कंपनी मुख्यत्वे कॅनडामध्ये बनवलेले ट्विन ऑटर विमान उडवते.

### या विमानाला शेवटचं मुस्तांग जिल्ह्यात पाहण्यात आले

या विमानाला शेवटचं मुस्तांग जिल्ह्यात पाहण्यात आलं. या विमानाने माउंट धौलागिरी येथे वळण घेतले. त्यानंतर या विमानाचा संपर्क तुटल्याची माहिती मुख्य जिल्हाधिकारी नेत्र प्रसाद शर्मा यांनी दिली होती. संपर्क तुटल्यानंतर विमान कोसळण्याची शक्यता व्यक्त केली जात होती. त्यामुळे प्रशासनाकडून तातडीने शोध मोहिम सुरु करण्यात आली. गृह मंत्रालयाने विमानाच्या शोधासाठी दोन खासगी हेलिकॉप्टर तैनात केले होते. लष्कराचे प्रवक्ते नारायण सिलवाल यांनी सांगितले की, नेपाळी लष्कराचे एमआय-१७ हेलिकॉप्टर तारा एयरच्या विमानाचा शोध घेण्यासाठी लेटे, मुस्तांग येथून रवाना झाले आहे. या फ्लाइटमध्ये कॅप्टन प्रभाकर घिमिरे, फ्लाइट अटेंडंट किस्मी थापा आणि अन्य क्रू मेंबर उत्सव पोखरेल हे तीन क्रू सदस्य होते.

# भाजप प्रवक्त्या नुपूर शर्मांविरोधात मुंबई एफआयआर दाखल

### टीव्ही वाहिनीवरील आक्षेपार्ह वक्तव्य भोवले



नवी दिल्ली । महाईन्यूज

भाजपच्या प्रवक्त्या नुपूर शर्मा (Nupur Sharma) यांच्या विरोधात मुंबईत एफआयआर (FIR) दाखल करण्यात आला आहे. एका वृत्तवाहिनीवरील चर्चेत प्रेषित मोहम्मद पैगंबरांबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य केल्याचा आरोप रझा अकादमीकडून करण्यात आला आहे. त्यामुळे नुपूर शर्मा यांना मोहम्मद पैगंबर यांच्याविरोधात आक्षेपार्ह वक्तव्य करणं भोवण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. मुंबईतील पायधुनी पोलीस ठाण्यामध्ये हा एफआयआर दाखल करण्यात आला आहे. एका वृत्तवाहिनीवरील चर्चेत नुपूर शर्मा सहभागी झाल्या होत्या. या चर्चेदरम्यान नुपूर यांनी प्रेषित मोहम्मद पैगंबर यांच्याबाबत काही आक्षेपार्ह विधानं करण्यात आली. या वक्तव्यामुळे मुस्लिम समुदायाच्या भावना दुखावल्या असल्याचे रझा अकादमीने म्हटले आहे. त्यानंतर रझा अकादमीने मुंबई पोलीस आयुक्तांकडे धाव घेतली होती. त्यानंतर मुंबई पोलीस आयुक्तांनी पायधुनी पोलिसांकडे तक्रार दाखल करण्यास सांगितले होते.

नुपूर शर्मा यांच्याविरोधात पायधुनी पोलिसांनी तक्रार दाखल केली असून IPC 295A, 153A आणि 505B कलमांतर्गत एफआयआर दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत. दरम्यान, नुपूर शर्मा याआधीही आपल्या ट्वीट आणि वक्तव्यांमुळे चर्चेत राहिल्या आहेत.

एमआयएमने नुपूर शर्मा यांच्याविरोधात हैदराबादमध्ये तक्रार दाखल केली असून त्यांच्याविरोधात अटकेची मागणी केली आहे. नूपुर शर्मा यांच्या वक्तव्याचा निषेध नॅशनल कॉन्फरन्सनेदेखील केला आहे. भाजप आणि केंद्र सरकारने आक्षेपार्ह वक्तव्याबाबत माफी मागावी, अशी मागणी नॅशनल कॉन्फरन्सकडून करण्यात आली आहे.

### 500च्या बोगस नोटांचं प्रमाण 100 टक्क्यांनी वाढलं !

# आरबीआयच्या अहवालातून चिंताजनक आकडेवारी समोर

। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

देशात बोगस नोटांचं प्रमाण वाढत आहे. आरबीआयच्या अहवालातून याबद्दलची आकडेवारी समोर आली असून ती चिंताजनक आहे. २०२१-२२ मध्ये बोगस नोटांचं प्रमाण वाढलं आहे. ५०० रुपयांच्या बोगस नोटांचं प्रमाण तब्बल १०१.९ टक्क्यांनी वाढलं आहे. तर २००० रुपयांच्या नोटांचं प्रमाण ५४.१६ टक्क्यांनी वाढलं आहे. ३१ मार्च २०२२ पर्यंत बाजारात असलेल्या ५०० आणि २००० रुपयांच्या नोटांचं प्रमाण ८७.१



टक्के होतं. ३१ मार्च २०२१ पर्यंत हे प्रमाण ८५.७ टक्के इतकं होतं. ३१ मार्च २०२२ पर्यंत ५०० रुपयांचं प्रमाण सर्वाधिक होतं. हे प्रमाण ३४.९ टक्के होतं. यानंतर १० रुपयांच्या नोटेचा नंबर लागतो. बाजारात असलेल्या एकूण चलनांत १० रुपयांच्या नोटांचं प्रमाण २१.३ टक्के आहे.

### मोदींच्या नोटबंदीच्या निर्णयावर प्रश्नचिन्ह !

चलनात असलेल्या बोगस नोटांचं प्रमाण वाढल्यानं पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ८ नोव्हेंबर २०१६ रोजी जाहीर केलेल्या नोटबंदीच्या निर्णयावर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहे. काँग्रेस, तृणमूल काँग्रेसच्या नेत्यांनी आरबीआयच्या अहवालानंतर मोदी सरकारला लक्ष्य केलं. 'भारतीय अर्थव्यवस्थेवर हल्ला हेच नोटबंदीचं एकमेव दुर्दैवी यश', अशा शब्दांत राहुल गांधींनी सरकारला लक्ष्य केलं.

# स्टार्टअपमधून नवा भारत उदयास येतोय!

### युनिकॉर्नची संख्या 100 पार; पंतप्रधान मोदींकडून कौतुक

। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज 89 व्या मन की बात कार्यक्रमाच्या माध्यमातून जनतेला संबोधित केले. आजच्या मन की बातमधून त्यांनी भारतातील स्टार्टअप्समधील कामगिरीचे कौतुक केले. पंतप्रधान म्हणाले की, काही दिवसांपूर्वीच देशाने अशी कामगिरी केली आहे, जी आपल्या प्रत्येकासाठी प्रेरणादायी आहे. यातून भारताच्या क्षमतेप्रती एक नवा आत्मविश्वास निर्माण होतो. क्रिकेटच्या मैदानावर टीम इंडियाच्या कोणत्याही फलंदाजाचे शतक ऐकून लोकांना आनंद होतो. तसाच भारताने दुसऱ्या मैदानात




ठोकलेले शतक खूप खास आहे. मोदी पुढे म्हणाले की, या महिन्याच्या 5 तारखेला देशातील युनिकॉर्नची संख्या 100 वर पोहोचली आहे. तुम्हाला माहिती आहे की, एक युनिकॉर्न, म्हणजे किमान साडे सात हजार कोटींचा स्टार्टअप. या युनिकॉर्नचे एकूण किंमत 330 अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त म्हणजे 25 लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे. प्रत्येक भारतीयासाठी ही नक्कीच अभिमानाची बाब आहे.

> देशाच्या या यशामागे देशाची युवाशक्ती, देशाचे सरकार सर्व मिळून प्रयत्न करत आहेत, सर्वांचे योगदान आहे, पण यामध्ये आणखी एक गोष्ट महत्त्वाची आहे, ती म्हणजे, स्टार्ट-इन अप वर्ल्ड, योग्य मार्गदर्शन, म्हणजेच योग्य मार्गदर्शन. एक चांगला मार्गदर्शक स्टार्टअपला नवीन उंचीवर नेऊ शकतो. योग्य निर्णयासाठी तो संस्थापकांना प्रत्येक प्रकारे मार्गदर्शन करू शकतो. मला अभिमान आहे की, भारतात असे अनेक मार्गदर्शक आहेत ज्यांनी स्वतःला ड्रायव्हिंग स्टार्ट-अपसाठी समर्पित करत आहेत.- **नरेंद्र मोदी**, पंतप्रधान

# 3 वर्षांनंतर सोनू सूद बॉलिवूडमध्ये 'या' चित्रपटातून करणार कमबॅक

बॉलिवूड अभिनेता सोनू सूद (SONU SOOD) तब्बल साडेतीन वर्षांनंतर बॉलिवूड (BOLLYWOOD INDUSTRY) इंडस्ट्रीत कमबॅक करत आहे. तो शेवटचा रणवीर सिंगसह 'सिम्बा' या बॉलिवूड चित्रपट दिसला होता, रोहित शेट्टीच्या दिग्दर्शित सिम्बा चित्रपटानंतर सोनू सूदने कन्नडमध्ये 'कुरुक्षेत्र' हा चित्रपटात झळकला, तर तेलगूमध्ये 'सीता', ALLUDU ADHURS आणि आचार्य या चित्रपटातही त्याने अभिनय केला. या चित्रपटांनंतर तब्बल साडे तीन वर्षांनी तो 'सम्राट पृथ्वीराज' ( SAMRAT PRITHVIRAJ) या हिंदी चित्रपटातून बॉलिवूडमध्ये कमबॅक करत आहे. या चित्रपटात अक्षय कुमार (AKSHAY KUMAR) मुख्य भूमिकेत दिसणार आहे. तर सोनू सूद चांर बरदाईची भूमिका साकारणार आहे. या चित्रपटाचा ट्रेलर नुकताच रिलीज झाला असून चाहत्यांमध्ये हा चित्रपट चर्चेत आहे. सोनू सूदचे चाहतेही त्याला बॉलिवूड सिनेमात पाहण्यासाठी



खूप उत्सुक आहेत.

'स्मार्ट पृथ्वीराज' हा चित्रपट हिंदीत बनवण्यात आला आहे, मात्र तमिळ आणि तेलुगु दोन भाषांमध्ये हा चित्रपट डब करण्यात येणार आहे. यापूर्वी या चित्रपटाचे नाव 'पृथ्वीराज' असे ठरवलेले होते. मात्र वादामुळे या चित्रपटाचे नाव बदलण्यात आले. आता या चित्रपटाचे नाव आहे 'सम्राट पृथ्वीराज' असे जाहीर करण्यात आले आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन चंद्रप्रकाश द्विवेदी यांनी केले आहे. हा चित्रपट ३ जून रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात संजय दत्त आणि मानुषी छिल्लर देखील मुख्य भूमिकेत झळकणार आहे.

'सम्राट पृथ्वीराज' व्यतिरिक्त सोनू सूद THAMILARASAN तमिळ आणि 'फतेह' या हिंदी चित्रपटात दिसणार आहे. 'फतेह' हा चित्रपट सोनू सूदच्या प्रोडक्शन हाऊस अंतर्गत बनवला जाणार आहे. त्याचे को- प्रोड्यूस झी स्टुडिओज करणार आहे. सोनू सूदने सोशल मीडिया पोस्टद्वारे चाहत्यांना ही माहिती दिली होती. सोनू सूदच्या या हिंदी चित्रपटाची चाहत्यांनाही उत्सुकता आहे.



# काजोल अन् न्यासा देवगण ट्रोलिंगची शिकार

बॉलिवूड अभिनेता अजय देवगण आणि काजोलची मुलगी न्यासा देवगनच्या बॉलिवूड डेब्यूबाबत चाहत्यांकडून अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत. दरम्यान न्यासाला तिच्या रंगावरून सोशल मीडियावर यापूर्वी बरचं ट्रोल करण्यात आले, मात्र अलीकडे न्यासासोबत आता आई काजोललाही फिटनेसवरून सोशल मीडियावर ट्रोल केले जातेय. नुकतेच काजोलला पिलाटे क्लासबाहेर स्पॉट करण्यात आले.

**काजोल फॅट शेमिंगची शिकार**

काजोलने अलीकडेच पापाराझींसाठी पोज देताना दिसली, यावेळचे तिचे अनेक फोटो आणि व्हिडीओ आता सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हायरल फोटोंवर यूजर्सकडूनही तिला फॅट शेमिंगचा शिकार बनवले जात आहे. एका यूजरने कमेंट करत लिहिले की – हा बिअर आला कुठून? दुसऱ्या एका यूजरने लिहिले की, हे लोक चित्रपटात इतके फिट दिसतात पण रिअल लाईफमध्ये काही तरी वेगळेच असतात. तिसऱ्या एका युजर्सने कमेंट्सम करत लिहिले की, काजोल काय आहे हे तुझे वजन का वाढत आहे? दरम्यान त्याच दिवशी कालोजची मुलगी न्यासा देवगनलाही सोशल मीडिया युजर्सनी ट्रोल केले होते. काजोलला तिच्या शरीरयष्टीसाठी ट्रोल करण्यात आलं होतं, तर न्यासाला नेहमीप्रमाणे तिच्या रंग आणि फिजिकल फिटनेससाठी ट्रोल करण्यात आलं. न्यासाच्या फोटोंवर एका यूजरने लिहिले की, 'माझ्या तोंडात विमल असल्यामुळे तू मास्क घातला आहेस का?' तर दुसऱ्या एका युजरने लिहिले की, तिने रंगावर खूप खर्च केला आहे.

**चाहत्यांना न्यासाच्या बॉलिवूड डेब्यूची प्रतिक्षा**

# प्राजक्ता माळीचा स्पेशल संडे!

अभिनेत्री प्राजक्ता माळी हिने तिच्या आजी-आजोबांसह खास फोटो शेअर केला आहे. यामध्ये तिने आजी-आजोबांसह 'सरसेनापती हंबीरराव' सिनेमा पाहिल्याबाबत सांगितले आहे. अभिनेत्रीने या सिनेमाचे आणि त्यासंबंधीत व्यक्तींचेही कौतुक केले आहे मुंबई: अभिनेत्री प्राजक्ता माळी नेहमी तिच्या वैयक्तिक आणि प्रोफेशनल आयुष्यामुळे चर्चेत असते. तिचे फोटोजही अनेकदा व्हायरल होतात. दरम्यान प्राजक्ता माळी तिच्या सोशल मीडियावरुन कुटुंबीयासोबतचे फोटो शेअर करते. शूटिंगच्या गडबडीत वेळात वेळ काढून ती घरच्यांना थोडाफार तरी वेळ देतेच हे तिच्या पोस्टमधून जाणवतं. दरम्यान आता प्राजक्ताने तिच्या आजी-आजोबांसह खास प्लॅन केला होता. यासंदर्भातील पोस्ट अभिनेत्रीने शेअर केली आहे.

अभिनेत्री प्राजक्ता माळी तिच्या आजी-आजोबांना सिनेमा पाहण्यासाठी गेली होती. दरम्यान ही पोस्ट शेअर करताना तिने 'सरसेनापती




हंबीरराव' या सिनेमाचे आणि त्यातील कलाकारांचे कौतुक केले आहे. अभिनेत्रीने पोस्ट शेअर करताना असे म्हटले आहे की, 'आजी-आजोबांसह एक दिवस. आणि आम्ही "सरसेनापती हंबीरराव" पाहिला.' ही पोस्ट शेअर करताना तिने आजी-आजोबांसह आणि अभिनेता-दिग्दर्शक प्रवीण तरडे याच्यासह एक फोटो शेअर केला आहे.

# मुलांना जगणं शिकवायचं तर 'हा' चित्रपट दाखवा; कुशल बद्रिकेच्या पोस्टची चर्चा

मराठी सिने इंडस्ट्रीतील लोकप्रिय अभिनेता आणि दिग्दर्शक प्रवीण तरडे यांचा अभिनयाने सजलेला हंबीरराव हा चित्रपट नुकताच प्रदर्शित झाला, प्रेक्षकांकडूनही चित्रपटाला तुफान प्रतिसाद मिळतोय. शिवरायांच्या स्वराज्याचं आणरी एक पान उलगडणारा हा चित्रपट प्रेक्षकांच्या मनावर वेगळी छाप सोडून जातोय. आपल्या विनोदाने प्रेक्षकांना खळखळून हसवणारा विनोदवीर कुशल बद्रिकेने नुकताच हा चित्रपट पाहिला. कुशल बद्रिके (KUSHAL BADRIKE) सोशल मीडियावर बराच सक्रिय असतो. अशात त्याच्या सोशल मीडिया पोस्टने सर्वांचेच लक्ष वेधून घेतले आहे. कुशलने नुकताचं अभिनेता आणि दिग्दर्शक प्रवीण तरडे (PRAVIN TARDE) यांचा 'हंबीरराव' (HAMBIRRAO) हा चित्रपट पाहिला आणि तो अक्षरशः भारावून गेला आहे. सध्या कुशलची हीच पोस्ट चांगलीच चर्चेत आली आहे. या पोस्टच्या माध्यमातून त्याने एक फोटो शेअर करत नेटकऱ्यांना त्यांच्या मुलांना हा चित्रपट दाखवण्याचे एक आवाहन केले आहे. कुशलने या पोस्टमध्ये लिहिले की, "हंबीरराव" एक दैदीप्यमान सिनेमा. एखादं ऐतिहासिक पुस्तक वाचताना, आपल्या डोळ्यांसमोर काही चित्र उभी रहातात, काही प्रसंग तर चक्क दिसू लागतात, पण "हंबीरराव" हा सिनेमा आपल्याला इतिहासात घेऊन जातो, आपण आपलं अस्तित्व विसरून इतिहास जगू लागतो, त्या लढायांमध्ये एखादी तलवार हाती घेऊन आपणही "स्वराज्याच्या पायरीला" शत्रूचा रक्ताने आणि आपल्या प्राणाने अभिषेक घालावा असं वाटत रहातं."



"प्रवीण तरडे मित्रा ह्या सिनेमासाठी मी तुझा आणि तुझ्या निर्मात्यांचा, कायम ऋणी राहीन."इतिहास आपल्याला जगायला शिकवतो", आपल्या मुलांना जर कसं जगायचं ? हे शिकवायचं असेल तर त्यांना सर सेनापती "हंबिरराव" नक्की दाखवा !!" असा आवाहन कुशलने पोस्टच्या शेवटी केलं आहे.

# अन्य' चित्रपटाचा धडाकेबाज ट्रेलर लाँच


हिंदीसह मराठीतही बनलेला 'अन्य' हा आगामी सिनेमा मागील बऱ्याच दिवसांपासून सिनेसृष्टीसोबतच रसिकांचेही कुतूहल वाढवत आहे. आगामी बहुप्रतिक्षीत सिनेमांच्या यादीतील महत्त्वपूर्ण चित्रपटांपैकी एक असलेल्या 'अन्य'चा धडाकेबाज ट्रेलर नुकताच प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. १० जून रोजी हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. उत्सुकता वाढवणाऱ्या 'अन्य'च्या ट्रेलरला प्रेक्षकांची चांगलीच पसंती मिळाल्यानं सध्या सोशल मीडियापासून डिजिटल माध्यमांमध्येही याच चित्रपटाची चर्चा आहे.




ग्लोबल इंडियन इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल आणि टोरंटो इंडिपेन्डंट फेस्टिव्हलमध्ये या चित्रपटानं कौतुकाची थाप मिळवली आहे. या चित्रपटाचं दिग्दर्शन दक्षिणात्य सिनेसृष्टीतील नामवंत दिग्दर्शक सिम्मी जोसेफ यांनी केलं आहे. प्रत्येक माणसात कुणी अन्य, कुणी दुसरा असतोच... तसाच प्रत्येक चांगल्या माणसातसुद्धा वाईट माणूस असतो... आणि प्रत्येक वाईट माणसात कुणी अन्य, कुणी दुसरा चांगला माणूससुद्धा असतो... असा विचार मांडणारा हा चित्रपट एका चांगल्या 'अन्य'ची कथा सांगणारा असल्याचं प्रथमदर्शनी ट्रेलर पाहिल्यावर जाणवतं. हेरगिरी, सत्य परिस्थिती, सेक्स ट्रॅफिकींग, बालमजूरी, अनाथांची व्यथा, शेतकऱ्यांच्या आत्महत्या या आजघडीच्या महत्त्वाच्या मुद्द्यांना स्पर्श करणारा 'अन्य' देशात बदल घडवणारे विचार सादर करणारा असल्याचं ट्रेलरमध्ये पहायला मिळतं. सत्य घटनांवर आधारलेला हा चित्रपट मानव तस्करीवर प्रकाशझोत टाकणारा आहे. एका डॉक्युमेंट्रीचा आधार घेऊन समाजातील कटू वास्तव आणि भयावह सत्य सादर करण्याचा प्रयत्न 'अन्य' करण्यात आला आहे.

## शॉर्ट न्यूज »

### ‘शेन वॉनला खूप मिस करतोय...’- जोस बटलर भावूक



**मेलबर्न । महाईन्यूज**

इंडियन प्रिमीयर लीगच्या प्ले ऑफमधील दुसरा क्वॉलिफायरचा सामना राजस्थान रॉयल्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात झाला. या सामन्यात राजस्थानचा सलामीवीर जोस बटलरने (JOS BUTTLER) 112 धावा केल्या. बटलरच्या या शतकी खेळीच्या जोरावर राजस्थानने बंगळुरूवर विजय मिळवला आणि अंतिम सामन्यात प्रवेश केला. या शतकी खेळीनंतर जोस बटलरने मोठे वक्तव्य केले आहे. ‘राजस्थान रॉयल्सचा (RR) पहिला कर्णधार शेन वॉर्न या संघासाठी खूप महत्त्वाचा आहे. आपण सर्वजण त्याला मिस करत आहोत’, असे वक्तव्य बटलरने केले.

“या स्पर्धेच्या अंतिम फेरीत खेळण्यासाठी मी खूप उत्सुक आहे. राजस्थान रॉयल्सचा (आरआर) पहिला कर्णधार शेन वॉर्न या संघासाठी खूप महत्त्वाचा आहे. आपण सर्वजण त्याला मिस करत आहोत.

### भारताने पहिल्यांदाच पटकावले कांस्य पदक

# पैराकैनो वर्ल्ड कपमध्ये भारताने रचला इतिहास!

## पॅरालिंपिक एथलिट प्राची यादवची कांस्य कमाई

**। नवी दिल्ली । महाईन्यूज ।**

**पैराकैनो** वर्ल्ड कपमध्ये भारताने इतिहास रचला आहे. या स्पर्धेमध्ये भारताने पहिल्यांदाच कांस्य पदक पटकावले आहे. पैरा कैनो एथलीट प्राची यादवने पोलंडच्या पोंजनानमध्ये सुरु असलेल्या पैराकैनो वर्ल्ड कपच्या महिला वीएल २०० मीटर स्पर्धेमध्ये कांस्य पदक पटकावले आहे. हे पदक पटकावणारी पहिली भारतीय महिला एथलिट बनून नवा इतिहास रचला आहे. प्राचीने 1.04.71 वेळेत कांस्य पदकावर आपलं नाव कोरलंय.

पैरा कैनो एथलीट प्राची यादव पैराकैनो वर्ल्ड कपमधील कॅनडाची सिल्व्हर मेडलिस्ट ब्रियाना हेनेसी आणि गोल्ड मेडलिस्ट ऑस्ट्रेलियाची सुजना सेपेलच्या मागे राहिली. भारताकडून २६ मे पासून ते रविवारपर्यंतच्या स्पर्धेतील प्राची यादवने दाखवलेले सर्वश्रेष्ठ प्रदर्शन होते.



### पुरुष गटाचा अंतिम सामन्यात प्रवेश

एथलिट प्राची यादवच्या चमकदार कामगिरीनंतर पुरुषांनीसुद्धा चांगली कामगिरी केली आहे. भारताच्या इतिहासात पुरुषांनीसुद्धा पहिल्यांदा अंतिम सामन्यात धडक दिली आहे. मनीष कौरव (केएल पुरुष 200 मीटर), मंजीत सिंह (वीएल2 पुरुष 200 मीटर) यांनी आपल्या स्पर्धेत अंतिम सामन्यात धडक पोहोचले आहे. असं भारताच्या इतिहासात पहिल्यांदाच झाले आहे. जयदीपने वीएल ३ पुरुष २०० मीटर स्पर्धेत उपांत्य फेरीसाठी क्वालीफाय केले होते. परंतु त्यांचा प्रवास इथेच थांबला आहे.



# भारतीय हॉकी संघाने जपानचा घेतला बदला

## सुपर 4 स्टेजमध्ये मॅचमध्ये 2-1 ने विजय

**। नवी दिल्ली । महाईन्यूज ।**

**भारतीय** हॉकी संघाने सुपर 4 स्टेजच्या पहिल्या मॅचमध्ये जपानला हरवून लीग स्टेजमधल्या पराभवाचा बदला घेतला. भारतीय हॉकी (INDIAN HOCKEY) संघाने जपानवर 2-1ने विजय मिळवला. ग्रुप स्टेजमध्ये जपानने भारताचा 2-5 असा पराभव केला होता.

या मॅचमध्ये मंजीत आणि पवन या दोघांनी भारतासाठी दोन गोल केले. मंजीतने सातव्या आणि पवनने 34 व्या मिनिटाला गोल केला. जपानसाठी ताकुमा नीवाने 17 व्या मिनिटला गोल केला. जपानला या सामन्यात पाच पेनल्टी कॉर्नर मिळाले. मात्र, त्यांना फक्त एका पेनल्टी कॉर्नरचे गोलमध्ये रुपांतर करता आले. भारताला एक पेनल्टी कॉर्नर मिळाला. मात्र, या पेनल्टी कॉर्नरचे त्यांना गोलमध्ये रुपांतर करता आले नाही. मंजीतने सातव्या आणि पवनने 34 व्या मिनिटाला गोल केला. जपानसाठी ताकुमा नीवाने 17 व्या मिनिटाला गोला केला. जपानला सपूर्ण सामन्यात 5 पेनल्टी कॉर्नर मिळाले. मात्र, त्यांना फक्त एकाच पेनल्टी कॉर्नरचे गोलमध्ये रुपांतर करता आले. तर भारताला एक पेनल्टी कॉर्नर मिळाला, त्याचे गोलमध्ये रुपांतर करता आले नाही.

**पुढचा सामना मलेशिया विरुद्ध –** जपानने लीग स्टेजमध्ये आपले सर्व सामने जिंकले होते. पूल ए मध्ये ते टॉपवर होते. भारत आणि पाकिस्तान दोघांचे चार पॉइंट्स होते. भारताने मोठ्या गोल फरकामुळे सुपर 4 मध्ये प्रवेश

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
708 309 8763

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही